चांदा ते बांदा योजने अंतर्गत सन २०१९-२०
साठी मागणी क्र.ओ.७, (३४५१A०२८) या
लेखाशिर्षाखाली निधी वितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग
शासन निर्णय क्रमांक:- चांबांयो-२०१९/प्र.क्र.८३/का.१४१८
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक :- २० जून, २०१९

वाचा:-

१) नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. डिएपी-१०१५/प्र.क्र.५१/का.१४१८१, दि.२९.०६.२०१६
२) नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. डिएपी-१०१५/प्र.क्र.५१/का.१४१८, दि.०७.०७.२०१९
३) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि.०१.०४.२०१९
४) जिल्हाधिकार चंद्रपूर यांचे पत्र क्र. जिप्रव्यक/का-१५/चांबांयो/२०१९/२५ दि.१५.०५.२०१९
५) जिल्हाधिकारी सिंधुदूर्ग यांचे पत्र क्र.Plan-चांदा ते बांदा/ दि.११.०६.२०१९

शासन निर्णय:-

नियोजन विभाग, शासन निर्णय दि.२९.०६.२०१६ अन्वये चंद्रपुर व सिंधुदुर्ग या जिल्ह्यातील नैसर्गिक साधनसंपत्तीचा इष्टतम वापर होण्यासाठी सधन नियोजन व अंमलबजावणीचा विशेष कार्यक्रम राबविण्याच्या अनुषंगाने चंद्रपूर व सिंधुदुर्ग या जिल्ह्यामध्ये "चांदा ते बांदा" ही योजना राबविण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे. तसेच नियोजन विभाग, शासन निर्णय दि.०७.०७.२०१७ अन्वये "चांदा ते बांदा" ही योजना राबविण्यासाठी योजनेच्या सुधारीत कार्यपध्दतीस मान्यता देण्यात आलेली आहे.

२. "चांदा ते बांदा" योजनेंतर्गत सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी मागणी क्र. ओ-७, लेखाशिर्ष "३४५१- सचिवालय आर्थिक सेवा, ०९०-सचिवालय, (०५) चांदा ते बांदा विशेष कार्यक्रम, (०५) (०२) चांदा ते बांदा योजनेंतर्गत विकास योजना राबविणे (३४५१A०२८)" या लेखाशिर्षाखाली एकुण रु.१४५.३४ कोटी इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आला आहे. अंतरिम अर्थसंकल्प २०१९-२० अंतर्गत (एप्रिल ते जुलै,२०१९) या चार महिन्यांसाठी अर्थसंकल्पिय प्रणालीवर (BDS) रु.४८.४५ कोटी निधी वाटपासाठी उपलब्ध झालेला आहे. जिल्हाधिकारी, चंद्रपुर व सिंधुदुर्ग यांनी संदर्भाधीन क्र. ४ व ५ च्या पत्रानुसार केलेली उद्दीष्टनिहाय मागणी विचारात घेऊन सदर लेखाशीर्षाखाली

अर्थसंकल्पिय प्रणालीवर (BDS) वर उपलब्ध निधी जिल्हाधिकारी, चंद्रपुर व सिंधुदुर्ग यांना पुढील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे उद्दीष्टनिहाय निधी वितरीत करण्यात येत आहे.

उद्दीष्ट	वितरीत करण्यात येत असलेला निधी (रु.लाखात)					
	चंद्रपूर			सिंधुदुर्ग		
	जुन २०१९	जुलै २०१९	एकुण	जुन २०१९	जुलै २०१९	एकुण
२१, पुरवठा व सामुग्री	३८.३१	७.६६	४५.९७	०.००	०.००	०.००
३१, सहायक अनुदाने (वेतनेतर)	१८५७.९५	३७१.५९	२२२९.५४	१८५७.९५	३७१.५९	२२२९.५४
३३, अर्थसहाय्य	७८.४३	०.००	७८.४३	०.००	०.००	०.००
५०, इतर खर्च	०.४४	०.००	०.४४	०.००	०.००	०.००
एकुण	**१९७५.१३**	**३७९.२५**	**२३५४.३८**	**१८५७.९५**	**३७१.५९**	**२२२९.५४**

३. “जिल्हा नियोजन अधिकारी तथा नियंत्रण अधिकारी, चंद्रपूर व सिंधुदूर्ग” यांनी सदरहू अनुदान “आहरण व संवितरण अधिकारी तथा सहायक जिल्हा नियोजन अधिकारी, चंद्रपूर व सिंधुदूर्ग” यांना वितरीत करावे. “आहरण व संवितरण अधिकारी तथा सहायक जिल्हा नियोजन अधिकारी, चंद्रपूर व सिंधुदूर्ग” यांनी मंजूर करण्यात आलेले अनुदान उद्दीष्ट निहाय व विहित मर्यादेत खर्च करावे. त्याचप्रमाणे मंजूर अनुदानापेक्षा जास्त खर्च होणार नाही याची दक्षता ध्यावी.

४. “चांदा ते बांदा” योजना अंतर्गत सन २०१९-२० करीता जिल्हाधिकारी, चंद्रपुर व सिंधुदुर्ग यांना या शासन निर्णयान्वये वाटप करण्यात येत असलेले अनुदान हे मासिक निधी विवरण पत्रानुसार (Cash Flow Statement) करण्यात येत आहे.

५. नियोजन विभागाचा हा शासन निर्णय, महाराष्ट्र विनियोजन (लेखानुदान) अधिनियम-२०१९ निधी वितरण याविषयी वित्त विभागाने निर्गमित केलेले शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१९/ प्र.क्र.४४/अर्थ-३, दि. ०१/०४/२०१९ मधील तरतूदी/निर्देशानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

नियोजन विभागाचा हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१९०६२०१११०२६३११६ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Tushar Purushottam Hirlekar

Digitally signed by Tushar Purushottam Hirlekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Planning Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6dd848a31422ed36ba4503d4744b6dc20833c851babace12b16b7bba3f67cca2, cn=Tushar Purushottam Hirlekar
Date: 2019.06.20 11:47:39 +05'30'

(तु. पु. हिर्लेकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई,
२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२,नागपूर,
३. महालेखापाल (लेखा परीक्षा) , महाराष्ट्र-१, मुंबई,
४. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर
५. जिल्हाधिकारी, चंद्रपुर व सिंधुदुर्ग.
६. उपायुक्त (नियोजन), विभागीय आयुक्त कार्यालय, नागपुर व नवी मुंबई.
७. संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र शासन, मुंबई.
८. जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती चंद्रपुर व सिंधुदुर्ग.
९. जिल्हा कोषागार अधिकारी, कोषागार कार्यालय, चंद्रपुर व सिंधुदुर्ग.
१०. प्रकल्प संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
११.वित्त विभाग, अर्थ-१६,मंत्रालय,मुंबई.
१२.निवडनस्ती/ का-१४१८.